**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**वृत्तप्रेस**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठीय उन्हाळी-२०२० परीक्षांकरीता ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप पर्यंत परीक्षा आवेदनपत्र सादर केलेली नसतील अशा विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रे भरण्याकरीता सूचनांचे पालन करावे.**

सर्व संबंधीतांचे माहितीकरिता कळविण्यात येते की, मा.संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांच्या दिनांक ८/०५/२०२० च्या पत्राच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे विद्यार्थी परीक्षा आवेदनपत्र भरण्यास पात्र आहेत.

अ) सदर परीक्षा आवेदनपत्र भरण्यास फक्त नियमित व माजी अंतीम सत्र/अंतीम वर्ष व त्याचे अनुशेष असलेले विद्यार्थी पात्र आहे. (उदा. सहा सत्र असलेल्या अभ्यासक्रमात सत्र सहा तसेच सत्र सहाच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ५, ४, ३ चे अनुशेष असतील, असे विद्यार्थी सदर आवेदनपत्र भरण्यास पात्र आहे)

ब) सर्व अभ्यासक्रमातील नियमीत सत्राचे / वर्षाचे विद्यार्थी ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक १३ डिसेबंर २०१९ ते १३ मार्च २०२० पर्यंत महाविद्यालयात वर्ग पूर्ण केलेले आहे, असे विद्यार्थी परीक्षा आवेदनपत्र भरण्यास पात्र आहेत. (उदा. नियमीत सत्रातील विद्यार्थी जसे नियमीत २, ४, ६, ८, व १० सर्व विद्यार्थी पात्र आहे.)

क) अंतिम सत्राचे/वर्षाचे बहिःशाल विद्यार्थी.

उपरोक्त विद्यार्थ्यांकरीता परीक्षा आवेदनपत्रे मुळ शुल्कामध्ये Online Google Form द्वारे दिनांक ६/०६/२०२० ते १०/०६/२०२० पर्यंत भरण्यासाठी उपलब्ध करुन दिलेले आहेत. या परीक्षा आवेदनपत्र भरण्यासाठी www.sgbau.ac.in या विद्यापीठ संकेत स्थळावर (News & Announcement) मध्ये Google Form ची **"उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्र भरण्याबाबत"** Link उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

याबाबतची नोंद विद्यार्थी, पालक व महाविद्यालयांनी घ्यावी, तसेच महाविद्यालयांनी याबाबतची संपूर्ण माहिती सर्व संबंधित विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर अवगत करुन द्यावी.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

---

क्र.संगाबाअवि-३/संपमूमं/३४०/२०२०
दिनांक - ५ जुन, २०२०

कृपया उपरोक्त माहिती सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, यासाठी विद्यापीठ संकेत स्थळावर तसेच विविध प्रसार माध्यमाद्वारे प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रति,

प्रमुख, संगणक प्रमुख / जनसंपर्क अधिकारी,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.